ePaper

## मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात शिंदे-ठाकरे गटांत राडा



| वर्ष - 6 । अंक - 212 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- संविधानाचा गळा घोटण्याचे काम सुरू
- पिंपरीतील फुल मार्केट होणार प्रशस्त!
- उंबरठा ओलांडल्यावर...


www.mahaenews.com | मंगळवार । दिनांक 15 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# निवडणुकीचा शंकर 'शंखनाद'!

## भाजपाची जोरदार तयारी : चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप 'ऑन फिल्ड'



### राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीला आव्हान...

चिंचवड मतदार संघात भाजपाने मोठ्या प्रमाणात काम सुरू केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांची कोंडी झाली आहे. चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, राजेंद्र जगताप, कैलास थोपटे, मोरेश्वर भोंडवे यांच्यासह राजू मिसाळ, अपर्णा डोके अशा मातब्बर माजी नगरसेवक पक्षाच्या संघटनात्मक बांधणीबाबत गंभीर नाहीत,असेच चित्र आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे भोसरी मतदार संघात गुंतून आहेत. आगामी २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत यापैकी एकाला पक्षाच्या तिकीटावर लढावे लागणार आहे. मात्र, सध्यस्थिती पहाता राष्ट्रवादी चिंचवड मतदार संघात पराभवाच्या मानसिकतेत दिसत आहे. यासह महाविकास आघाडीचा संभाव्य उमेदवार म्हणून माजी नगरसेवक राहुल कलाटे यांच्याकडे पाहिजे जाते. मात्र, त्यांनीही अद्याप राजकीय भूमिका गुलदस्त्यात ठेवल्यामुळे महाविकास आघाडीचा पाय खोलात दिसत आहे.

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी तथा माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी आगामी निवडणुकीचा 'शंखनाद' केला असून, संघटनात्मक बांधणीवर भर दिला आहे. शहरातील राजकीय पटलावर निर्णायक असलेल्या चिंचवडमधून भाजपाचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प "टीम-शंकर शेठ " ने केला असून, राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.**

"पक्ष मजबूतीसाठी बुथ मजबूत असणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक बुथवर कार्यकर्त्यांची नेमणूक करावी. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये ज्या बुथवर कमी मते मिळाली होती अशा बुथचे प्राधान्याने सक्षमीकरण करण्यावर भर द्यावे. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपची प्रथमच सत्ता आली. पाच वर्षांत भाजपाने शहर अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. या कामांबाबत जनजागृती झाल्यास पक्षाचे काम लोकांपर्यंत पोहोचेल. त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करावे. केंद्र व राज्य सरकारच्या सर्वच योजना कल्याणकारी आहेत. या योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र नागरिकांपर्यंत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पोहोचले पाहिजे."

**- शंकर जगताप, निवडणूक प्रभारी, चिंचवड विधानसभा, भाजपा**

२०१७ मध्ये भारतीय जनता पार्टीने तत्कालीन शहराध्यक्ष तथा चिंचवड मतदार संघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक लढवली होती. त्याला भोसरीचे आमदार महेश लांडगे यांची साथ मिळाली. भाजपाच्या 'राम-लक्ष्मण' जोडीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची १५ वर्षांची सत्ता उलथून लावली होती.

दरम्यान, आमदार जगताप यांच्या प्रकृतीच्या कारणास्तव त्यांच्या राजकीय कारकीर्दीत



'पडद्यामागील हिरो' असलेले माजी नगरसेवक शंकर जगताप यांना मैदानात उतरावे लागले. भाजपाचे प्रदेश नेतृत्व अर्थात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्चशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शंकर जगताप यांच्या खांद्यावर चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारीपदाची जबाबदारी सोपवली.

### निवडणुकीसाठी सज्ज रहा...

पिंपरी-चिंचवडमधील कॉर्पोरेट क्षेत्रात 'मिस्टर परफेक्ट' अशी ओळख असलेल्या शंकर जगताप यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीला खरे उतरण्यासाठी प्रभावी नियोजन केले आहे. त्यांनी नुकतेच चिंचवड-किवळे मंडलातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची वाल्हेकरवाडीत आढावा बैठक घेतली. संघटनात्मक बांधणी, मतदान केंद्रावरील बुथ सक्षमीकरण, प्रत्येक बुथवर पक्ष कार्यकर्त्यांच्या नेमणुकीचा त्यांनी माहिती घेतली.

तसेच पक्षाच्या बांधणीसाठी मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे पक्षाचे काम, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहचवण्याचे आणि आगामी महापालिका निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहे.

# संविधानाचा गळा घोटण्याचे काम सुरू

## राज्याचे विरोधी पक्षनेता अजित पवार यांची टीका

। पुणे। महाईन्यूज।

**संविधान आणि लोकशाहीवर विश्वास असलेल्यांचा किंवा संविधान मानणाऱ्यांचा गळा घोटण्याचा प्रकार अलीकडच्या काळात होत आहे, अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेता अजित पवार यांनी नाव न घेता भारतीय जनता पक्षावर सोमवारी येथे केली. संविधान मानणाऱ्यांनी लोकशाहीला डाग लागणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.**



आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे स्मारक समितीच्या वतीने क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त पुरस्कारांचे वितरण अजित पवार यांच्या हस्ते सोमवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता अंबादास दानवे, आमदार चेतन तुपे, माजी मंत्री रमेश बागवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख गजानन थरकुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे, स्मारक समितीचे अध्यक्ष विजय डाकले यावेळी उपस्थित होते. लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या रखडलेल्या कामासाठी तत्कालीन राज्य सरकारने ८७ कोटी महापालिकेला दिले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात स्मारकच्या जागेचे भूसंपादन शक्य झाले. स्मारकाचे काम यापूर्वीच होणे अपेक्षित होते. मात्र महापालिकेत दुसऱ्या विचारांच्या माणसांची सत्ता होती. त्यामुळे अनेक अडचणी आल्या. मात्र, आता स्मारकाचे काम मोठ्या स्वरूपात झाले पाहिजे. स्मारकासंदर्भात काही सूचना लक्षात आणून द्याव्यात. स्मारकाचे काम तातडीने करण्यासाठी महापालिका प्रशासकांकडे पाठपुरावा करावा लागणार आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.दानवे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने स्मारकासाठी जागा उपलब्ध करून दिली. अलीकडे सत्तेसाठी मरणारे आणि सत्ता असेल तरच जगणाऱ्या विचाराचे लोक आहेत. त्यामुळे क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचारांची आवश्यता आहे.

---

# कारखानानिहाय ऊस तोडणी, वाहतूक खर्च जाहीर

## एफआरपीमधील वजावाटीत पारदर्शकता येणार

पुणे । महाईन्यूज ।

साखर आयुक्तालयाने राज्यातील कारखानानिहाय ऊसतोडणी आणि वाहतूक खर्च जाहीर केला आहे. त्यामुळे रास्त आणि किफायतशीर दरातून (एफआरपी) होणाऱ्या वजावटीत पारदर्शकता येणार आहे. शेतकऱ्यांनाही आपल्या ऊस बिलातून किती वजावट होते, याचा अंदाज घेऊन कोणत्या कारखान्याला ऊस गाळपासाठी द्यायचा, याचा निर्णय घेता येणार आहे.

या बाबत माहिती देताना साखर आयुक्त शेखर गायकवाड म्हणाले,



शेतकरी संघटना आणि शेतकरी अनेकदा ऊसतोडणी आणि वाहतूक खर्चाबाबत शंका उपस्थित करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या ऊस बिलातून किती वजावट होते. याची माहिती मिळावी. एखाद्या कारखान्यांची वजावट जास्त असेल, तर पर्यायी कारखान्याला ऊस घालता येणार आहे किंवा शेतकरी स्वत: ऊसतोडणी करून आपला ऊस कारखान्याला नेऊन घालू शकतात. बिलाबाबत पारदर्शक व्यवहार होण्यासाठी आयुक्तालयाने जाहीर केलेली कारखानानिहाय ऊसतोडणी आणि वाहतूक खर्च उपयोगी आहे.

# आगामी काळात राष्ट्रवादीला उमेदवारही मिळणार नाहीत!

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

पुणे । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसची आम्हाला गरज नाही. हा पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाही. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हेच राष्ट्रवादीचे धोरण आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत कोणी टिकत नाही. आगामी काळात राष्ट्रवादीकडे उमेदवारही राहणार नाहीत, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी केली.

पुण्यातील भांडारकर इन्स्टिट्युट येथील कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, की बारामतीत दहशतीचे वातावरण आहे. गेल्या ४० वर्षांपासून एकाच घरात सत्ता



आहे. त्यामुळे तेथील लोक बाहेर बैठकीत येण्यासही घाबरतात. राष्ट्रवादी नेत्यांकडे नैतिकता असेल, तर जितेंद्र आव्हाड यांच्या आमदारकीचा राजीनामा घेतला पाहिजे. तसेच आव्हाड यांना निलंबित केले पाहिजे. ज्या कारणासाठी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे, त्याच्या कृतीचे समर्थन करून बोलणाऱ्यांचे नाव गुन्ह्यात सहभागी करण्याची मागणी आहे. राज्य सरकारने संवेदनशील मार्गाने गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, 'फ्रेंड्स ऑफ भाजपा' असे अभियान सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना, विकास, नागरिकांच्या पक्षाच्या बाबतीत, सूचना जाणून पक्षाच्या वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्यात येतील. सन २०२४ पर्यंत केंद्र आणि राज्य सरकारकडून पुण्याच्या विकासासाठी प्रयत्न करू. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आमची तयारी सुरू असून महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस आणि इतर मित्र पक्ष ४५ लोकसभा आणि २०० विधानसभा जागा जिंकण्याचे नियोजन सुरू आहे. त्यासाठी संघटनात्मक बांधणी सुरू आहे.

---

# पुणे विद्यापीठ अधिसभा निवडणुकीत संस्थाचालक गटात बिनविरोध निवड!

पुणे । महाईन्यूज ।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीतील संस्थाचालक गटात बिनविरोध निवड झाली. विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत पहिल्यांदाच बिनविरोध निवड झाली असून, विद्यापीठ विकास मंचाच्या उमेदवारांची निवड झाली. विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया सध्या



सुरू आहे. संस्थाचालक, प्राचार्य, पदवीधर अशा विविध गटांसाठी निवडणूक होत आहे. त्यातही पदवीधर निवडणुकीत राजकीय पक्षांची पॅनेल उतरल्याने ही निवडणूक चुरशीची आणि लक्षवेधी ठरण्याची शक्यता आहे. संस्थाचालक प्रतिनिधी गटातून सहा जागांसाठी अधिसभा सदस्यपदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. सहा जागांपैकी चार खुला वर्ग, प्रत्येकी एक जागा महिला आणि एसटी प्रवर्गासाठी आरक्षित होती. सहा जागांसाठी दहा उमेदवारांचे अर्ज आले होते. त्यानंतर कुलगुरूंनी घेतलेल्या अंतिम निर्णयात आणखी दोन अर्ज वैध ठरले. एसटी प्रवर्गासाठी एकही अर्ज नव्हता. त्यामुळे ही जागा रिक्त राहिली. पाच जागांसाठी अर्ज माघारीचा रविवार हा शेवटचा दिवस होता. त्यात अखेरच्या क्षणी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव संदीप कदमसह अन्य उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले.

संस्थाचालक गटातील निवडणुकीचे चित्र रविवारी स्पष्ट झाले. संस्थाचालक गटात एकूण सहा जागा होत्या. त्यात पाच जागांवर विद्यापीठ विकास मंचाच्या सदस्यांची बिनविरोध निवड झाली खुल्या गटातून डॉ. राजेंद्र विखे-पाटील, डॉ. अपूर्व हिरे, प्रा. विनायक आंबेकर, अशोक सावंत यांची, तर महिला गटात डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच संस्थाचालक गटात बिनविरोध निवडणूक झाल्याची माहिती विद्यापीठ विकास मंचाचे समन्वयक राजेश पांडे यांनी दिली.

## अतिरिक्त जागा उपलब्ध करण्यास प्रशासनाची तयारी

# पिंपरीतील फुल मार्केट होणार प्रशस्त!

## आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सुरू असलेल्या फुल बाजारासाठी आता शेजारील क्रोमा शोरुमजवळ असेलेल्या स. नं. २१० पैकी भूखंड क्र. २ उपलब्ध करुन देण्याबाबत महापालिका प्रशासनाने तयारी दर्शवली आहे. त्यामुळे फुलबाजार प्रशस्त होणार असून, व्यापारी आणि ग्राहकांसह शेतकऱ्यांचीही सुविधा होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख प्रलंबित प्रश्नांसदर्भात भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी महापालिका भवनामध्ये बैठक घेतली होती. यावेळी पिंपरी- शगुन चौक येथील फुलबाजारासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध करणेबाबत चर्चा करण्यात आली. महापालिका



प्रशासक व आयुक्त आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, प्रदीप जांभळे-पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र कोळंबे, वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, कर संकलन विभागाचे सहआयुक्त निलेश देशमुख, शिक्षण विभागाचे उपायुक्त संदीप खोत, प्रशासन अधिकारी संजय नायकडे उपस्थित होते.

कर संकलन विभागाचे सह आयुक्त निलेश देखमुख म्हणाले की, क्रोमा शोरुमशेजारील सुविधा भूखंड क्र. २१० मधील जागा पिंपरी फुल मार्केटकरीता हस्तांतरित करण्याबाबत प्रस्ताव आहे. सदर जागेचे मूल्यांकन करण्यासाठी भूमि जिंदगी विभागाला मागणी केली आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, शगुन चौकात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने फुल बाजारासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध करण्याची आवश्यकता होती. या फुल मार्केटमध्ये शेतकरी आपला माल विक्रीसाठी घेवून येतात. तसेच शहरातील नागरिक फुल खरेदीकरीता याठिकाणी गर्दी करतात. वाढत्या व्यापारामुळे जागा अपुरी पडत होती. त्यामुळे पिंपरी-चिंचवड फुल व्यापारी संघ आणि कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून अतिरिक्त जागा मिळणेबाबत मागणी करण्यात आली होती. याबाबत प्रशासन सकारात्मक असून, जागा हस्तांतरणासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू केली आहे.

> पिंपरी फुल बाजारात शेतकरी, गोरगरिब, कष्टकरी अनेक नागरिक फुल विक्री- खरेदीचा व्यवसाय करतात. त्यांचा उदरनिर्वाह या मार्केटवर अवलंबून आहे. सर्वाजनिक ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही. याची दक्षता घेवून प्रशासनाने सकारात्मक भूमिकेतून फुल मार्केटसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी सूचना केली आहे. कारण, २०१७ पासून हा प्रस्ताव प्रलंबित आहे.
>
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# ठरलं...स्वच्छ सर्वेक्षणात अव्वल यायचे !

## प्रशासनाचे आवाहन : जनसंवाद सभेत विविध तक्रारींचे निराकरण

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**अर्बन आऊटकम फ्रेमवर्क २०२२ अंतर्गत करण्यात येत असलेल्या सिटीझन परसेप्शन सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या प्रतिक्रिया नोंदवून आपल्या शहराला या स्पर्धेमध्ये अव्वल क्रमांक मिळविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन आज झालेल्या जनसंवाद सभेच्या माध्यमातून नागरिकांना करण्यात आले आहे.**

जनसंवाद सभा ही नागरिक आणि महापालिका यांच्यातील दुवा ठरत असून विविध प्रश्न, सूचना, तक्रारींच्या माध्यमातून महापालिकेची ध्येय धोरणे, निर्णयांमध्ये नागरी सहभाग वाढवण्यासाठी देखील महत्वाची भूमिका बजावत आहे. नागरिकांनी घेतलेला सक्रीय सहभाग, अनुभव, जाणीवा यांचा शहराच्या जडणघडणीमध्ये महत्वाचा वाटा आहे. या शहराच्या विकासाला अधिक गतिमान करण्यासाठी प्रत्येकाचे निरंतर योगदान आवश्यक असून त्यातूनच शहराचा नावलौकिक वाढणार आहे. सिटीझन परसेप्शन सर्वेक्षण देखील नागरी सहभागामुळे यशस्वी होणार असून यामध्ये प्रत्येकाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत ६४ नागरिकांनी




सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे १४, ६, ३, ५, ५, ४, १६ आणि ११ नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह, या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, समाज विकास विभागाचे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, भूमी आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी, यांनी भूषवले. तसेच क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, सोनम देशमुख, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, सीताराम बहुरे, शितल वाकडे, विजयकुमार थोरात हे उपस्थित होते.

### ... अशा आहेत नागरिकांच्या सूचना

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. महापालिकेची क्रीडा मैदाने आणि उद्यानांचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी न करण्याबाबत महापालिकेने निर्गमित केलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, रस्त्यातील खड्डे बुजवताना उंचवटा तयार होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, मुख्य रस्त्यावरील खोल गेलेले चेंबर समतल करावेत, उद्यानात धुम्रपान तसेच अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पथक नेमावे, काही महापालिका कर्मचारी बायोमॅट्रीक थम्ब करून विनापरवाना कार्यालयाबाहेर जात असल्याचे निदर्शनास येत असून अशा कर्मचा-यांवर प्रशासनाने कारवाई करावी, पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या भागात जलवाहिन्या टाकण्यात याव्यात, पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, फुटलेल्या मलवाहिन्या लवकर दुरुस्त कराव्यात, शहरामध्ये विविध ठिकाणी स्थळदर्शक आणि मार्गदर्शक फलक लावावेत, शहरात सार्वजनिक मुतारी आणि शौचालयांची संख्या वाढविण्यात यावी, शहर परिसरात वेळोवेळी कीटकनाशक फवारणी करण्यात यावी, शहरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची वारंवार पाहणी करून नादुरुस्त असलेले कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत तसेच आवश्यकतेनुसार कॅमे-यांची संख्या वाढवावी, अनधिकृत बांधकामे तसेच रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करावी, रस्त्यावरील बेवारस वाहने तसेच अनेक दिवसांपासून रस्त्यावर उभी असलेली वाहने जप्त करण्यात यावीत, अशा सूचनावजा तक्रारींचा समावेश आहे.

## संपादकीय »

# राजकीय इच्छाशक्तीसाठी युद्धनितीचा वापर

***'युक्रेन युद्धातून भारताने काय धडा घ्यावा याचा एका लेखातून ऊहापोह केल्याबद्दल जनरल मनोज नरवणे (निवृत्त) यांचे जेवढे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. या लेखात त्यांनी शहाणपणाचे, थेट आणि वास्तव विचार मांडले आहेत. ते म्हणतात, इतिहासात डोकावून बघितले असता युद्धभूमी सतत बदलत आणि उत्क्रांत होत असल्याचे दिसून येते***

पहिल्या महायुद्धाचा विचार केला तर खंदकांना भेदण्यासाठी रणगाड्यांचा आविष्कार झाल्याचे दिसून येते. त्याआधी घोडदळाला नामोहरम करण्यासाठी मशिनगनचा शोध लागला. त्यामुळे सैन्याला खंदकांचा सहारा घ्यावा लागला. विसाव्या शतकात रणगाडेविरुद्ध रणगाडाभेदी यंत्रणा असा सामना चालला. युक्रेनमध्ये हा सामना वेगळ्याच स्तरावर गेला आहे. नव्वदच्या दशकात ड्रोनचा शोध लागला. लष्कराच्या शास्त्रज्ञांनी लवकरच त्याचे शस्त्रात रूपांतर केले. ड्रोनच्या विध्वंसक क्षमतेचा वापर प्रभावीपणे कसा केला जाऊ शकतो याचा वस्तुपाठ युक्रेनने घालून दिला आहे. या युद्धाने भलीमोठी सशस्त्र रचना (आर्मर्ड फॉर्मेशन), मोठाली शस्त्रसज्ज जहाजे तसेच लढाऊ व मारक क्षमता असलेल्या विमानांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह लावले आहे.वरील मुद्दे मांडताना नरवणे असाही दावा करतात की, तंत्रज्ञानातील बदल पहिले येतात आणि नंतर काळाच्या ओघात ते लष्करी नेतृत्वात झिरपतात. पण असे नेहमीच घडले आहे काय ? याचे उत्तर नेहमीच असे घडते असे नाही. पहिल्या महायुद्धात विशेषतः ब्रिटिश अधिकाऱ्यांनी घोडदळाला मशिनगनच्या तोंडी दिल्याचे अनेक दाखले आहेत. अर्थात यात कामी आलेले बहुतांश सैनिक ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भारतासारख्या देशातील होते. क्रिमियन युद्ध, बोअर युद्ध आणि दोन महायुद्धांमध्ये याचे दाखले पदोपदी दाखवून देता येतात. लष्करी नेतृत्वाच्या अशाच वैचारिक कमजोरीवर नॉर्मन डिक्सन यांनी त्यांच्या पुस्तकात सविस्तर भाष्य केले आहे. हे पुस्तकातून भारतासह अन्य देशांच्या लष्कर अकादमीमध्ये अधिकाऱ्यांना शिकवले जाते. युक्रेनने रशियाच्या मागच्या पिढीतील रणगाडे कसे कुचकामी आहेत, हे दाखवून दिले. या युद्धात युक्रेनने रशियाचे पंधराशे रणगाडे आणि किमान तीन हजार चिलखती वाहने उध्वस्त केल्याच्या चित्रफिती वा छायाचित्रे उपलब्ध आहेत. या युद्धात रणगाड्यांचा समोरासमोर सामना कुठे झालाच नाही. रशियन रणगाड्यांच्या दृष्यतेच्या टप्प्यात युक्रेनचे रणगाडे आलेच नाहीत. ड्रोन आणि उपग्रह संदेशवहन प्रणालीचा वापर करून युक्रेनने रशियाचे रणगाडे नेमकेपणाने उध्वस्त केले.

# उंबरठा ओलांडल्यावर...




ताई, आमचं बालपण बालगृहात गेलं ना गं! अशा विषयाच्या वेळेस बालगृहातल्या मैत्रिणींसोबत बोलणं, एवढंच हातात असतं आमच्या; पण आज बघ, कसं अगदी क्लिअर झालंय सगळं...' 'युवा तर्पण'तर्फे बालगृहातून बाहेर पडलेल्या माझ्या मैत्रिणींसाठी मासिक पाळी या विषयावर स्त्रीरोगतज्ञ डॉ. स्नेहा रोंगे यांच्याशी संवाद आयोजित केला होता. त्यानंतर एका मैत्रिणीने माझ्याशी झालेल्या गप्पांमध्ये दिलेली ही हळवी प्रतिक्रिया.

बालपणाचा आणि बालगृहाचा उंबरठा एकाच वेळी ओलांडणे किती आव्हानात्मक असते, हे आज 'बालदिना'च्या दिवशी समाजाने उघड्या डोळ्याने बघणे, ही काळाची गरज आहे. 'अनाथ' हा शब्द उच्चारला, की डोळ्यासमोर लहान लहान मुले येतात आणि ती राहत असलेली अनाथालये (बालगृह). ही मुले आयुष्यभर लहानच असतात का? फक्त समाजात, घरात राहणारी मुलेच मोठी होतात का? बालगृहातील ही मुले मोठी होतच नाहीत का? ही मुले मोठी होतात, तेव्हा ती अनाथालयात का दिसत नाहीत? आपण अनाथालयात मोठी मुले कधी बघितली आहेत का? मग ही मुले-मुली जातात कुठे? त्यांचे कुणीच नसते, म्हणून येतात ना बालगृहात? मग वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालपणाचा आणि बालगृहाचा उंबरठा ओलांडल्यावर सगळेच मिळते का त्यांना? पालक नाहीत, म्हणून बालगृहात ही मुले येतात ना? वयाची १८ वर्षे झाली, की या मुलांना बालगृहातून बाहेर पडावे लागते. त्यानंतर या सर्व मुला-मुलींना पालक, शिक्षण, आधार, दिशा हे सर्व कसे मिळते किंवा मिळते का, असे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांची कधी चर्चाही होत नाही.विनाकारण डेपो वाढल्याने प्रशासकीय खर्चाचा बोजा वाढतो आहे. साधारण दीडशे डेपो कायम तोट्यात आहेत. तिथे फक्त बस ठेवून प्रशासकीय व देखभालीचा खर्च कमी केला पाहिजे. राज्यातल्या एका तालुक्यात तर गरज नसताना निव्वळ राजकीय अट्टहासापोटी तीन डेपो निर्माण करण्यात आले आहेत. खरे तर ही मुले बालगृहात येतात, तेव्हा त्यांची राहण्याची व्यवस्था होते, योग्य ती जेवण्याची व्यवस्था



असते. बाल न्याय कायद्यामुळे त्यांना सुरक्षेचे कायदेशीर कवच मिळते. ते मूल रीतसर दर वर्षी शिकत गेले, तर शिक्षणाची व्यवस्थाही असते. अर्थात, या सर्व व्यवस्थांची वास्तविक स्थिती काय आहे, हा संशोधनाचा आणि मोठ्या चिंतेचाही विषय असल्याचे कित्येक अभ्यासकांचे, या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांचे मत आहे. या संबंधी आपण वेळोवेळी वाचत असलेल्या बातम्या बोलक्या असतात आणि याविषयीचे सत्य सांगत असतातच; पण तरीही बरी किंवा वाईट का होईना, या मुलांसाठी एक मूलभूत सुविधा उपलब्ध होते, हे खरे आहे. आज बालदिनाच्या निमित्ताने बालगृहामध्ये कार्यक्रम होतील. सरकार-प्रशासनाचे प्रतिनिधी विविध योजना, सुविधा घोषित करतील. वेगवेगळ्या सामाजिक संस्था आज बालगृहात जाऊन देणगी देतील. काही संस्था किंवा माणसे वस्तुरूपाने मदत करतील. दर वर्षीच हे होत असते, ते व्हायलाही हवे; पण गेल्या वर्षी दिसलेली काही मुले-मुली आज का दिसत नाहीत, हे कधी लक्षात येतच नाही कुणाच्या; त्यामुळे 'कुठे गेले असतील ते?' असा प्रश्नही कुणाला पडत नाही.

आजकाल आपल्या मुलांचे वाढदिवस बालगृहात साजरे करण्याची पद्धत रूढ होत आहे. एका बाजूने आपल्या पाल्याला समाजातील एका संवेदनशील विषय़ाविषयीचे भान देण्याची ही कल्पना उत्तम आहे; पण त्याच वेळेस त्या मुलांना काय वाटत असेल, य़ाची आपण कल्पना करतो का? कोणत्याही गोष्टीला दोन बाजू असतात, तशा यालाही आहेत. अशामुळे अनाथ मुलांविषयी, त्यांच्या जगण्याविषयी बाहेरच्या जगात संवेदनशीलता निर्माण होते हे खरे आहे; परंतु बालगृहातील सर्वच मुलांवर त्याचा सारखाच परिणाम होत असेल, असे नव्हे. बालगृहात राहण्याचे कायदेशीर वय संपल्यावर, तिथून बाहेर पडताना या मुलांना काय वाटत असेल, याची कल्पना करून पाहा. अगदी कालपर्यंत सर्वच असते. राहण्यासाठी बालगृह असते, जेवण, नाश्ता, आवश्यक ते शिक्षण असते. वयाची १७ वर्षे ३६४ दिवस पूर्ण होऊन ते १८ वर्षांचे झाले,

# मधुमेहापासून दूर राहायचे... तर कसे जगायचे, काय खायचे?

**आधुनिक जीवनशैली, जलद शहरीकरण, देशभर (ग्रामीण व तशा दुर्गम भागांतही) झालेला मोबाइल/ संगणक आदी तंत्रज्ञानाचा सुळसुळाट, यामुळे बसून राहण्याची सवय वाढते आहे.**

वाढती संपन्नता आणि बदलती सामाजिक आर्थिक स्थिती, त्यामुळे अन्नाची सहज उपलब्धता याहीमुळे बैठेपणात वाढ झाली आहे. भारतच नव्हे, तर जगभरातील लोक हल्ली अधिक खातात, हे स्पष्टपणे आपण पाहू शकतो. खाण्यापिण्याच्या सवयीही झटपटपणाकडे झुकत आहेत. तृणधान्यांची सहज उपलब्धता आणि कमी किमतीत मिळणारे- विशेषतः पॉलिश केलेले तांदूळ, गव्हाचे पीठ, अतिरिक्त साखर, स्टार्च, मीठ आणि चरबी/तेल यांमुळे निव्वळ उष्मांक वाढतात, मग शहरी आणि ग्रामीण भागात वजन वाढण्याची समस्या दिसू लागते. 'फास्ट फूड' काही परदेशीच असते असे नाही, आपले चटपटीत खाद्यपदार्थही विशेषत: आरोग्यवर्धनाच्या दृष्टीने तुटपुंजेच ठरतात. हे चटपटीत पदार्थ केवळ चवींवर लक्ष केंद्रित करतात, त्यामुळे त्यांची सवय लगेच लागते. 'टाइप टू मधुमेह' यासारखे आजार होऊ शकतात... दूध आणि दुग्धजन्य उत्पादने ही अनेक भारतीयांसाठी प्रथिनांचे एकमेव स्त्रोत आहेत आणि ते सेंद्रिय आणि पर्यावरणीय रसायनांपासून



मुक्त असल्याची खात्री करण्याव्यतिरिक्त त्यांना 'व्हिटॅमिन डी'ची जोड देणे आवश्यक आहे. विशेषत: कीटकनाशके आणि रसायनांच्या अवशेषांपासून मुक्त असलेल्या अन्नपदार्थांसाठी अन्न आरोग्य सुरक्षा नियमांची तातडीची गरज आहे कारण ते नियम नसताना बोकाळलेले रसायनयुक्त खाद्यपदार्थ हे केवळ मधुमेहाच्याच पसरण्याला नव्हे तर इतरही असंसर्गजन्य रोगांना आणि काही प्रकारच्या कर्करोगांना देखील कारणीभूत ठरू शकतात. पारंपरिक तसेच आधुनिक भारतीय आहारामध्ये कर्बोदके (कार्बोहायड्रेट) आणि स्निग्ध पदार्थांचे प्रमाण जास्त आहे आणि त्यात प्रथिनांचा अभाव आहे. फायबरच्या कमतरतेमुळे आणि फळे आणि भाज्यांचे सेवन शहरी आहारात कमी होत आहे. भारत हा विविध खाद्य सवयींचा देश आहे. प्रत्येक भारतीय घरात शिजवलेले अन्न वेगळे असते आणि खाणे, सणासुदीचे पदार्थ आणि उपवासाचेही खाद्यपदार्थ या साऱ्याच्या चवी-परी प्रांत, धर्म तसेच कुटुंबाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीनुसार बदलतात. जलद आर्थिक विकास आणि खेड्यांपासून शहरांकडे स्थलांतर यामुळे जीवनशैलीत बदल झाले आहेत. त्यामुळेच मानवी चयापचय प्रक्रियेत व्यत्यय येऊन, कर्करोग आणि नैराश्यासारख्या मानसिक आरोग्याच्या समस्यांव्यतिरिक्त मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयरोग यांसारखे असंसर्गजन्य रोग पेरले जात आहेत.

भारतीयांना चविष्ट अन्न हवे असते, जे अनेकदा तळलेले आणि जास्त तेलात शिजवलेले असते. दर महिन्याला प्रति व्यक्ती अर्धा किलोपेक्षा कमी खाद्यतेलाचा वापर करा, वनस्पती तेलातुपासारखे 'ट्रान्सफॅट' आहारातून पूर्णपणे बाद करा, तेल किंवा पदार्थ पुन्हा गरम करणे टाळा आणि एकाच प्रकारचे खाद्यतेल न वापरता, दोन प्रकारची खाद्यतेले एकमेकांत मिसळावीत आणि त्यापैकी एक तरी 'राइस ब्रान'सारखे कमी ऊष्मांकांचे तेल असावे, असे आम्ही डॉक्टरमंडळी सांगत असतो.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### “काम करायचे नसेल तर राजीनामा द्या”- राज ठाकरे



। मुंबई । महाईन्यूज ।

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेकडून पक्षबांधणीसाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. अनेक ठिकाणी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे मेळावे घेण्यात येत आहेत. आज वांद्रे येथे पदाधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होता. या बैठकीला स्वत: राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी राज ठाकरेंकडून काम न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची कान उघडणी करण्यात आली असल्याची माहिती आहे. दरम्यान, या बैठकीनंतर मनसे नेते बाळा नांदगावर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. “प्रत्येक मतदार संघाची परिस्थिती नेमकी काय आहे? याचे अवलोकन करण्यासाठी आजची बैठक आयोजित करण्यात आली होती.

# जितेंद्र आव्हाडांविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल!

## ठाणे शहरात ठिकठिकाणी जाळपोळ

। नागपूर। महाईन्यूज ।



‘हर हर महादेव’ चित्रपटाच्या शो थांबवून प्रेक्षकांना मारहाण केल्याप्रकरणी राज्याचे माजी मंत्री आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांना अटक करुन रविवारी त्यांची जामीनावर सुटका करण्यात आली. मात्र आता आव्हाड यांच्याविरोधात कलम ३५४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. म्हणजेच आव्हाड यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला असून यानंतर ठाणे शहरातील अनेक ठिकाणी जाळपोळ करुन वाहतूकीमध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादीच्या समर्थकांनी केला आहे. आव्हाड यांनीही आक्रमक भूमिका घेत थेट आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. आव्हाड यांच्याविरोधात भादंविनुसार कलम ३५४ अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून. लैंगिक शोषण, मारहाण किंवा महिलांच्या स्वाभिमानाला धक्का लावणारं कृत्य करणाऱ्यांविरोधात या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला जातो. याच कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर आज सकाळपासूनच ठाण्यात तणाव निर्माण झाला असून आव्हाड यांच्या विवियाना मॉलजवळच्या घरासमोर काही ठिकाणी रस्त्यावर जळलेले टायर टाकून वाहतूक कोंडी करण्याचा प्रयत्न झाला. पोलिसांनी माझ्या विरुद्ध ७२ तासांत २ खोटे गुन्हा दाखल केले आहेत. ते ही ३५४... मी पोलिसांच्या या अत्याचाराविरुद्ध लढणार... मी माझ्या आमदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेत आहे... लोकशाहीची हत्या उघड्या डोळ्यांनी नाही बघू शकत,” असं ट्वीट आव्हाड यांनी केलं आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राज्यातील आक्रमक नेते आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड हे ‘हर हर महादेव’ चित्रपटास केलेला विरोध आणि त्यानंतर रंगलेल्या अटक नाट्यामुळे पुन्हा एकदा पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

# विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावणाऱ्या तिघांना अटक

। अलिबाग। महाईन्यूज ।



ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावणाऱ्या तिघांना रायगड पोलीसांनी जेरबंद केले आहे. रायगडच्या स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने ही कारवाई केली असून अलिबाग पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दी रविकिरण हॉटेल येथे काही लोक इंग्लड विरुध्द पाकीस्तान सामन्यासाठी सट्टा लावणार असल्याची खबर पोलीसांना मिळाली होती. पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या पथकाने रविवारी रविकिरण हॉटेलमध्ये छापा टाकला. यावेळी दोन आरोपी विश्वचषक सामन्यासाठी चालू असलेल्या अंतिम सामन्यावर त्यांच्याकडील मोबाइ वर सट्टा लावून खेळत असल्याचे आढळून आले. चौकशी दरम्यान आणखिन एक आरोपी निष्पन्न झाला. जो मुंबईतून सट्टा लावण्याचे काम पहात होता. त्याला गुन्हे शाखेने मुंबईतून ताब्यात घेतले आहे. अँड्रॉ रिचर्ड फेर्नांडिस 38 रा. सांताकृज, मानिष दौलत टुकरेल 42 रा. अंधेरी आणि राजेंद्र वडलदास भाटिया रा. शास्त्रीनगर, मुंबई अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. तिघांकडून पाच हजार रुपयांची रक्कमही जप्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात जुगार कायद्यानुसार आणि भारतीय तार अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपास सुरु आहे. दरम्यान , आरोपींना न्यायालयात हजर केले असता तिघांनाही न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# अलिबागमधील लाचखोर तहसिलदारांना न्यायालयीन कोठडी

## आरोपींकडून जामिनासाठी अर्ज दाखल

।अलिबाग। महाईन्यूज ।



अलिबागच्या लाचखोर तहसिलदार मिनल दळवी यांना पोलीस कोठडीची मुदत संपल्याने अलिबागच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २८ नोव्हेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. बक्षीसपत्राने दिलेल्या जमिनीच्या सात – बाऱ्यावर तक्रारदार यांचे नाव चढविण्यासाठी तसेच जागेसंदर्भात दाखल झालेल्या अपिलाचा निकाल तक्रारदाराच्या बाजूने देण्यासाठी मिनल दळवी यांनी तीन लाख रुपयांची लाच मागितली होती. खाजगी हस्तक राकेश चव्हाण याच्या मार्फत दोन लाखांची लाचेची रक्कम स्वीकारलीही होती. गेली दोन दिवस त्या पोलीस कोठडीत होत्या. पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने आज त्यांना अलिबाग येथील विशेश सत्र न्यायाधीश अशोक कुमार भिलारे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने दळवी यांची पोलीस कोठडी वाढवून मिळावी अशी मागणी यावेळी जिल्हा सरकारी वकील अँड भुषण साळवी यांनी केली. तर घरझडती आणि आवाज नमुने घेण्याचे काम पुर्ण झाले आहे. मुद्देमालही हस्तगत केला आहे. त्यामुळे आता पुन्हा पोलीस कोठडीची गरज नाही असा युक्तीवाद दळवी यांच्या वतीने अँड प्रविण ठाकूर यांनी केला. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तपास पुर्ण झाला असल्याने दोन्ही आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले. यानंतर दोन्ही आरोपींच्या वतीने जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

# ऊसदराबाबत शेतकरी संघटनांची सिद्धनाथाचे दर्शन घेऊन पायी दिंडी

## यशवंतराव चव्हाणांच्या समाधीला घातले साकडे

। कराड । महाईन्यूज ।



उसाला प्रतिटन साडेतीन हजार रुपयांप्रमाणे पहिली उचल देण्याची सुबुद्धी साखर कारखानदारांना द्यावी असे साकडे यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीवर शेतकरी संघटनांच्यावतीने नतमस्तक होऊन घालण्यात आले. कोपर्डे हवेली येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन उसदरासाठी निघालेली टाळ-मृदुंगाच्या गजरातील पायी दिंडी कराडच्या प्रीतिसंगमावर विसावली. येथील माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीवर उस आणि फुले वाहून शेतकरी व सामाजिक संघटनांच्या नेत्यांनी व शेतकऱ्यांनी ‘उसाला साडेतीन हजाराच्या पहिल्या देयकासाठी सातारा जिल्ह्यातील साखर कारखानदारांना सुबुद्धी द्या’ असे साकडे घातले.

उसदर संघर्ष समितीच्या पुढाकाराने निघालेल्या या सहा किलोमीटरच्या पायी दिंडीत रयत क्रांती संघटनेचे प्रमुख माजी मंत्री सदाभाऊ खोत, पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सचिन नलवडे, बळीराजा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पंजाबराव पाटील, जिल्हाध्यक्ष विश्वास जाधव, बैलगाडा शर्यत संघटनेचे नेते धनाजी शिंदे, प्रहार संघटनेचे अमोल कारंडे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ‘उसदर आमच्या हक्काचा, नाही कुणाच्या बापाचा’, ‘शेतकरी एकजुटीचा विजय असो’ अशा घोषणांनी प्रीतिसंगम उद्यान परिसर दणाणून गेले होते. सदाभाऊ खोत या वेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, राज्याचे पहिले मुख्यमंत्री व उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात सहकार आणि साखर कारखानदारी उभी केली. आज मात्र चव्हाणसाहेबांचे नाव घेऊन सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या लोकांना त्यांच्या मूळ विचाराचा विसर पडलाय. शेजारच्या कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने उसाला जो दर देत आहेत. तेवढाच साखर उतारा असताना साताऱ्यातील कारखानदार कोल्हापूरप्रमाणे उसदर का देत नाही हा आमचा प्रश्न आहे.

राज्यकर्त्यांनी दोन साखर कारखान्यामधील अंतराची अट काढून टाकावी आणि खुली स्पर्धा निर्माण करावी. सर्व उद्योग खुले असतील, त्यावर असे बंधने नसतीलतर ती साखर कारखान्यांबाबतीत का असा सवाल करून, आमच्या बापाच्या शेतात जे पिकतंय त्यावर तुम्ही बंधन लावताय आणि त्यातील संबंधित साखर कारखानदाराला मोकळे रान करून देताय हे अतिशय चुकीचे असल्याची खंत सदाभाऊंनी व्यक्त केली. शरद जोशी यांनी झोनबंदीची लढाई सन १९८४ ला सुरु केली आणि १९९६ ला ही बंदी अखेर उठली. त्याप्रमाणेच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढत राहू. पण, आमच्या मागण्या मान्य केल्याखेरीज स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा खोत यांनी दिला.

# उदयपूरमध्ये रेल्वे ट्रॅक उडवण्याचा कट!

## ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

। हैदराबाद । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राजस्थानमधील उदयपूरमध्ये होणाऱ्या G20 शिखर परिषदेपूर्वी घातपाताचा एक मोठा कट फसला आहे. उदयपूरमध्ये रेल्वे ट्रॅक बॉम्बने उडवण्याचा प्रयत्न सुरु होता. यावेळी ग्रामस्थांनी बॉम्बस्फोटाचा आवाज ऐकून घटनास्थळी धाव घेत, वरिष्ठांना माहिती दिली आहे. यावेळी आरोपींनी रेल्वे ट्रॅकवरील अनेक नट - बोल्ट गायब केल्याचे आढळून आले. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली आहे.



उदयपूर सालुंबर मेघा महामार्गावरील ओडा पुलाजवळ रेल्वे ट्रॅकवर हा घातपाताचा प्रयत्न होता. यावेळी ट्रॅकवरील नट-बोल्टही गायब आढळले. ट्रॅकच्या मधोमध असलेली लोखंडी प्लेटही उखडलेली आढळून आली. याठिकाणी राहणाऱ्या ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा त्यांना पुलाजवळील ट्रॅकवर स्फोटाचा आवाज आला. स्फोटाच्या 4 तास आधी येथून एक ट्रेन गेल्याचे सांगण्यात येत आहे.

सकाळी ग्रामस्थांच्या माहितीवरून रेल्वेचे उच्च अधिकारी घटनास्थळी पोहोचले. यासोबतच उदयपूरचे विभागीय आयुक्त राजेंद्र भट्ट, जिल्हाधिकारी ताराचंद मीना आणि एसपी विकास कुमार शर्माही संधीची पाहणी करण्यासाठी पोहोचले. दरम्यान अहमदाबादहून उदयपूरला येणारी ट्रेन डुंगरपूर येथे थांबवण्यात आली आहे.

रेल्वे व्यवस्थापकाने सध्या या मार्गावर धावणाऱ्या दोन्ही गाड्या थांबवल्या आहेत. रेल्वे रुळावरील नट-बोल्ट आणि लोखंडी प्लेट गायब झाल्याची माहिती स्थानिक लोकांनी पोलिसांना दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. शनिवारी रात्री ट्रॅकवरून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे.

उदयपूर अहमदाबाद ट्रेनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 31 ऑक्टोबर 2022 रोजी असरवा स्टेशनवरून हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली होती. या ट्रॅकसाठी तब्बल 16 वर्षे वाट पाहावी लागली होती.

## गुजरात विधानसभेसाठी काँग्रेसने कंबर कसली

नवी दिल्ली गुजरातमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या तयारीला वेग आला असून, सत्तेत येण्यासाठी 42 नेत्यांची विशेष टीम तयार केली आहे. यासाठी काँग्रेसने 5 बड्या नेत्यांची झोन निरीक्षक म्हणून, तर 32 नेत्यांची लोकसभा निरीक्षक आणि 5 नेत्यांची अतिरिक्त निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

गुजरात विधानसभा निवडणूक 2022 साठी काँग्रेसने मुकुल वासनिक, मोहन प्रकाश, पृथ्वीराज चव्हाण, बीके हरिप्रसाद आणि केएच मुनियप्पा यांची विभागीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्याचबरोबर 32 नेत्यांना लोकसभा निरीक्षक बनवण्यात आले असून त्यात प्रेमसाई सिंग टेकम आणि अशोक बैरवा यांच्या नावांचा समावेश आहे.

## गुजरात विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादीला मोठा दणका

### एकमेव आमदाराने सोडली साथ

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



एकीकडे गुजरात राज्यात विधानसभा निवडणुकीचं बिगूल वाजलं आणि दुसरीकडे पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली. अशातच गुजरात विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे एकमेव आमदार कांधल जडेजा यांनी आगामी राज्य निवडणुकीसाठी काँग्रेससोबत युती केल्यानंतर पक्षाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीने पोरबंदरमधील कुतियाना मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास नकार दिल्यानंतर जडेजांचा राजीनामाही आला आहे.

जडेजा 2012 पासून कुतियाना येथून गुजरात विधानसभा निवडणूक जिंकत आहेत. 2017 च्या निवडणुकीत 50 टक्क्यांहून अधिक मताने जिंकुन त्यांनी भाजप आणि काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांचा पराभव केला होता.

"होय, त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. तिकीट न दिल्याचे कारण त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे." असे गुजरात राष्ट्रवादीचे प्रमुख जयंत बोस्के यांनी सांगितले आहे. ते म्हणाले की जडेजा यांनी राज्यसभा निवडणूक आणि राष्ट्रपती निवडणुकीच्या दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आदेशाची अवज्ञा केली होती आणि भाजप उमेदवाराच्या समर्थनार्थ मतदान केले होते. जडेजा यांनी 11 नोव्हेंबर रोजी कुतियाना येथून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून आधीच उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्याच दिवशी, राष्ट्रवादीने काँग्रेस पक्षासोबत तीन जागांसाठी उमरेठ, नरोडा आणि देवगड बारिया साठी युतीची घोषणा केली आणि त्यांचे उमेदवार निवडणूक लढवत असल्याचे सांगितले. गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी येत्या १ डिसेंबरला आणि ५ डिसेंबरला मतदान होणार आहे. निकाल म्हणजेच मतमोजणी ८ डिसेंबरला होणार आहे.

# मिझोराममध्ये दगडाची खाण कोसळली!

### 5 जण अडकल्याची भीती

। एझॉल। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ईशान्य भारतातील मिझोराममध्ये एक दगड खाण कोसळली असून या भीषण अपघातात १५ कामगार अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोमवारी दुपारी खाणीतले कामगार जेवणाच्या सुट्टीनंतर परतत असताना ही दुर्घटना घडली.

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, दुर्घटना घडली तेव्हा नथिलाल जिल्ह्यातील मौदार इथं एबीसीएल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या दगड खाणीत काम करणारे कामगार नुकतेच जेवणाच्या सुटीवरुन खाणीत परतत होते. दरम्यान, कोसळलेल्या या खाणीत १५ कामगार अडकले आहेत. यामध्ये पाच पोकलेनचे चालक आणि इतर ड्रिलिंग मशीनचे ऑपरेटर्स या दगडांच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले.

या दुर्घटनेची माहिती कळताच जवळच्या शहरातील बचाव पथकाच्या स्वयंसेवकांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली आणि बचाव मोहिम सुरु केली. मदतीसाठी राज्य सरकारनं अधिक बचाव पथकांना घटनास्थळी पाचारण केलं.



# गुजरातमध्ये मुस्लिम तरुणांकडून ओवैसींचा निषेध

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर AIMIM प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी कंबर कसली आहे. ते मुस्लिमबहुल भागात जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करत मोठमोठ्या रॅली काढत आहेत. काल रात्री ते सुरत पूर्व विधानसभेत आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी गेले होते.**



यादरम्यान गुजरातच्या राजकीय संघर्षाचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. हे चित्र ओवैसींच्या निवडणुकीचे मनसुबे उधळणार आहे, कारण ओवैसींना त्यांच्याच सभेत मुस्लिम समाजाच्या विरोधाला सामोरे जावे लागत आहे. हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी मंचावर भाषण सुरू करताच मुस्लिम तरुणांनी निषेधार्थ घोषणाबाजी सुरू केली.

सूरतच्या रॅलीत मुस्लिम तरुणांनी ओवैसींना काळे झेंडे दाखवले आणि गो बॅकच्या घोषणा दिल्या. सूरतच्या सभेत भाषण देण्यासाठी ओवैसी स्टेजवर उभे राहताच तेथे उपस्थित मुस्लिम तरुणांनी मोदी-मोदीच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. ओवैसी जिथे जिथे रॅलीला जातात तिथे ते आपल्या समर्थकांची गर्दी घेऊन जातात. समर्थक ओवैसींच्या कार्यपद्धतीबद्दल घोषणाबाजी करतात पण सुरतमध्ये उलट आहे. रॅलीच्या ठिकाणी स्थानिक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी मोदींच्या समर्थनार्थ आणि ओवैसींच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली आणि मंचावर उभे असलेले ओवैसी हे सर्व पाहत राहिले. आपल्या प्रत्येक सभेत मुस्लिम कार्ड खेळणाऱ्या ओवैसींनी या भाषणादरम्यान दलित कार्ड खेळायला सुरुवात केली.

आपल्या भाषणात ते म्हणाले, "पंतप्रधान, दलित, आदिवासी आणि ओबीसींच्या विरोधात आहेत. ते वंचितांचे हक्क हिरावून घेत आहेत आणि ते उच्चवर्णीय लोकांना देत आहेत. मी माझ्या दलित बांधवांना, आमच्या वंचित बांधवांना, आदिवासी बांधवांना आणि ओबीसी बांधवांना सांगू इच्छितो की EWS हा कायदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या नावाखाली भाजपने या कायद्याद्वारे जो कायदा बनवला आहे तो EWS चा कायदा नसून उच्चवर्णीयांसाठी बनवला आहे.



# ‘इंडिया लॉकडाऊन’चे नवे पोस्टर प्रदर्शित

सई ताम्हणकर सध्या मराठी सिनेसृष्टीमधील आघाडीची अभिनेत्री आहे. बोल्ड आणि बिनधास्त अभिनेत्री अशी ओळख असणाऱ्या सईने अभिनयाच्या बळावर नाव कमावले आहे. तिने मराठीसह हिंदी चित्रपटांमध्येही काम केले आहे. आमिर खानच्या ‘गजनी’ चित्रपटामध्ये ती झळकली होती. ‘मिमी’ या चित्रपटामध्ये तिने महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. तिच्या कामाचे सर्वांनी कौतुक केले होते. तिला या चित्रपटासाठी अनेक पुरस्कारदेखील मिळाले आहेत. चित्रपट, मालिकांसह तिने काही वेब सीरिजमध्येही काम केले आहे.

सई सोशल मीडियावर फार सक्रिय आहे. या माध्यमाद्वारे ती चाहत्यांशी संवाद साधत असते. गेल्या काही दिवसांपासून सई इन्स्टाग्राम अकाऊंटवर तिच्या ‘इंडिया लॉकडाऊन’ या आगामी चित्रपटाबद्दलचे अपडेट्स देत आहे. नुकतेच तिने या चित्रपटाचे नवे पोस्टर शेअर केले. या पोस्टरद्वारे तिचा या सीरिजमधला नवा लूक समोर आला आहे.

‘इंडिया लॉकडाऊन’ चित्रपटामध्ये सई ताम्हणकरने साकारलेल्या पात्राचे नाव ‘फूलमती’ असे आहे. पोस्टरमध्ये हे नाव मोठ्या अक्षरांमध्ये लिहिले आहे. एखाद्या सामान्य घरातल्या मध्यमवर्गीय बाईप्रमाणे तिचा लूक आहे. साधी साडी, गळ्यात मंगळसुत्र आणि कपाळावर कुंकू असा अवतार तिने केला आहे. तिच्या फोटोमागे भारताचा नकाशा पाहायला मिळतो. टाळेबंदी दाखवण्यासाठी साखळ्या आणि टाळ्याचा वापर पोस्टरमध्ये करण्यात आला आहे.

या पोस्टरला सईने “त्यांच्यासमोर खूप अडचणी येत होत्या. जीवन जगण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत होता आणि या महामारीमुळे त्याच्या त्रासात भर पडली”, असे कॅप्शन दिले आहे. मधुर भांडारकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. सई व्यतिरिक्त प्रतीक बब्बर, श्वेता बासु प्रसाद, आहाना कुमरा आणि प्रकाश बेलवाडी या कलाकारांनी काम केले आहे.

# करणच्या मुलांनी तयार केलं डिस्को दीवानेचं थर्ड व्हर्जन?




करण जोहर हा बॉलिवूडमधील प्रसिद्ध चेहरा आहे. तो नेहमीच बॉलिवूडमधील स्टार किड्सला त्याच्या चित्रपटात लॉन्च करत असतो. त्यामूळे त्याला नेपोटिझम सारख्या आरोपांचां सामनाही करावा लागतो. त्याने स्टुडंट ऑफ द इयर मध्येही तीन स्टार किड्सला संधी दिली. तो चित्रपटही चांगलाच हिट झाला. त्यातील "डिस्को दीवाने" हे गाणं अजूनही लोकप्रिय आहे.

हे गाणं पहिल्यांदा 1981 मध्ये नाझिया हसनच्या चित्रपटात वापरले गेलं आणि नंतर करण जोहरने त्याच्या दिग्दर्शित स्टुडंट ऑफ द इयरसाठी या गाण्याचं रीमिक्स केले. आता नुकतच त्याने या गाण्याच्या तिसऱ्या व्हर्जनची झलक दिली. खरं तर त्याने हे गाणं लॉन्च वैगरे केलेलं नाही तर त्याची मुलं यश आणि रुही यांनी हे गाणं गायलं आहे आणि त्याच्या हूक स्टेप्सही केल्या आहेत. त्यांच्या स्वत: च्या बोबड्या आवाजात मुलांनी गायलेलं हे गाणं सध्या सोशल मिडियावर व्हायरल होतं आहे. करणने इंस्टाग्रामवर हा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत त्याचा मुलगा यशने हातात लहान डिस्को बॉल्स पकडलेला आहे. तु काय गातोय असं विचारतो आणि यश गाणं गायला सुरवात करतो. लगेच त्याची बहीण रुहीपण त्याच्यासोबत गाते.

त्यानंतर करण म्हणतो हे या गाण्याचं 2.O व्हर्जन आहे.व्हिडिओ शेअर करताना, करण जोहरने संगीतकार विशाल ददलानी आणि शेखर रावजियानी यांनाही टॅग केलंय, ज्यांनी SOTY साठी गाणे रीमिक्स केले होतं. “ही #DISCODEEWANE ची तिसरं व्हर्जन आहे! कृपया @VISHALDADLANI आणि @SHEKHARRAVJIANI यांची नोंद घ्या!” असं कॅप्शन दिलं आहे. याव्हिडिओवर नीतू कपूरने, नेहा धुपिया, मनीष मल्होत्रा आणि प्रीती झिंटाने प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्याचं बरोबर दिया मिर्झाने, सोफी चौधरी, मिनी मल्होत्रा यांनीही त्याचं कौतूक केलं आहे. करण नेहमीच त्याच्या मुलांचे असे मजेदार व्हिडिओ त्याच्या चाहत्यासोबत शेअर करत असतो.

# प्रार्थना बेहेरे सोशल मिडियावर प्रचंड सक्रिय

मालिका. चित्रपट या माध्यमातून रसिकांच्या घराघरात आणि मनमनात पोहोचलेली अभिनेत्री प्रार्थना बेहेरे सोशल मिडियावर प्रचंड सक्रिय असते. तिचे व्हिडिओ, फोटो पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतात. आज



तर तिने चक्क आपल्या नवऱ्यासोबत म्हणजेच अभिषेक जवकर सोबत एक रोमँटिक व्हिडिओ शेयर केला आहे. त्याचे निमित्तही तसेच खास आहे.. तेच जाणून घेऊया..

प्रार्थनाने आज हा व्हिडिओ शेयर केला कारण त्यामागे एक खास कारण आहे. ते कारण म्हणजे प्रार्थनाने 14 नोव्हेंबर 2017 मध्ये अभिषेक जावकर सोबत लग्नगाठ बांधली. आज त्यांच्या लग्नाला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याच निमित्ताने तिने दोघांमधील एक गोड क्षण चाहत्यांसोबत शेयर केले आहेत. या व्हिडिओला तिने 'हॅप्पी 5' असे कॅप्शनही दिले आहे. अभिषेक जावकर हा लेखक, दिग्दर्शक, निर्माता आहे. अर्थशास्त्रात पदवीधर असलेल्या अभिषेकला परदेशात जाऊन एमबीए करण्याची इच्छा होती. पण, कॉलेजच्या दिवसांमध्ये इव्हेंट मॅनेजमेन्टसाठी काम करणाऱ्या अभिषेकला त्याच्या मित्राने चित्रपट निर्मितीत येण्याचा सल्ला दिला आणि तो निर्मिती क्षेत्रात आला. आज तो यशस्वी निर्माता आहे.

# “तुमच्याकडे पैसे कमी असतील तरी...” प्रिया बापट



मराठीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणून प्रिया बापटला ओळखले जाते. अनेक चित्रपट, मालिका, नाटक आणि वेब सीरिजमध्ये काम करून तिने अभिनयाचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. प्रिया बापट ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती कायमच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक गोष्टी शेअर करत असते. नुकतंच प्रिया बापटने तिच्या आयुष्याबद्दल एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामुळे ती चर्चेत आली आहे. प्रिया बापटचा सोशल मीडियावर मोठा चाहतावर्ग आहे. प्रिया बापट ही इन्स्टाग्रामवर कायमच सक्रीय असते. अनेकदा ती विविध पोस्ट आणि व्हिडीओ शेअर करताना दिसते. नुकतंच तिने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे.

# योगा क्विन शिल्पाचा हा सोपा व्यायाम दूर करेल तुमचा कंप्युटर व्हिजन सिंड्रोम

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टीने नुकताच तिच्या इंस्ट्राग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केलाय. या व्हिडीओमध्ये तिने डोळे निरोगी ठेवण्याबाबतचा एक सोपा व्यायाम सांगितलाय. व्हिजन सिंड्रोम असणाऱ्यांसाठी हा व्यायाम फायदेदायी ठरणारा आहे.

अलीकडे आपली अर्ध्यापिश्रक्षा जास्त कामे ऑनलाईन चाचली असल्याने प्रत्येकाचाच स्क्रिन टायमिंग वाढलाय. मोबाईल, लॅपटॉपपुढे आपण जास्तीत जास्त वेळ घालवत असल्याने डोळ्यांच्या विविध समस्या निर्माण होता. सतत स्क्रिनपुढे राहिल्यामुळे डोळ्यांना जळजळ होणे, डोळे लाल होणे, डोळे कोरडे पडणे, डोळे पाणावणे यासारख्या समस्या सामान्य होत आहेत. डोळ्यांशी संबंधित या समस्यांना सामान्यतः 'कॉम्प्युटर व्हिजन सिंड्रोम' म्हणतात. विज्ञान तंत्रज्ञान प्रगती झाली आणि आपली जवळपास सगळीच कामे ऑनलाईन स्क्रिनपुढे व्हायला लागली. त्यामुळे अनेकांना डोळ्यांच्या समस्याही वाढायला लागल्या.



# मेरी कोम, पीव्ही सिंधूची इंडियन ऑलिम्पिक समितीवर झाली निवड

ॲडलेड ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारताची बॉक्सिंगमध्ये पाचवेळा जागतिक अजिंक्यपद पटकावणारी मेरी कोम, दोन ऑलिम्पिक पदके जिंकणारी पी व्ही सिंधू आणि शिवा केशवन यांची भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या खेळाडूंच्या सामितीवर निवड झाली आहे. आज दिल्लीत पार पडलेल्या निवडणुकीनंतर याची घोषणा करण्यात आली. या तिघांबरोबरच अजून 7 सदस्यांची देखील या समितीवर निवड करण्यात आली आहे.

भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या खेळाडूंच्या सामितीवर वेटलिफ्टर मीराबाई चानू, नेमबाज गगन नारंग, टेबलटेनिसपटू अचंता शरथ कमल, हॉकीपटू राणी रामपाल, सायकलपटू भवानी देवी, रोव्हर बजरंग लाल आणि माजी शॉट पूटर ओपी करहाना यांची देखील निवड झाली आहे. या दहा सदस्यांच्या समितीमधील 5 सदस्य या ऑलिम्पिक खेळलेल्या महिला खेळाडू आहेत. केशवन हा एकटाच विंटर ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेला खेळाडू आहे. या समितीवर निवड होण्यासाठी फक्त 10 सदस्यांनी आपला अर्ज दाखल केला होता. या समितीत 10 जागांसाठीच निवडणूक होणार होती. त्यामुळे या सर्वांची बिनविरोध निवड झाली. याचबरोबर अभिनव बिंद्रा आणि हॉकीपटू सरदार सिंग हे देखील सहयोगी संस्थांचे सदस्य म्हणून या समितीत असणार आहेत.



# “भारताने इंग्लंडकडून काहीतरी शिकावं”

## माजी क्रिकेटपटूचा भारतीय संघाला सल्ला



ॲडलेड।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

**१३ नोव्हेंबरला मेलबर्न येथे पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यामध्ये टी२० विश्वचषकासाठीचा अंतिम सामना रंगला. या सामान्यामध्ये इंग्लंडच्या संघाने सुरुवातीपासूनच शानदार प्रदर्शन केले. इंग्लडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि गोलंदाजांनीही हा निर्णय सार्थ ठरवला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी धारदार गोलंदाजी करत एकही पाकिस्तानी फलंदाजाला मोठी धावसंख्या करू दिली नाही. इंग्लंडने पाकिस्तानला निर्धारित २० षटकात ८ बाद १३७ धावांवर रोखले.**

पाकिस्तानने इंग्लंडला १३७ धावांचे आव्हान दिले. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या इंग्लंडला पहिल्याच षटकात जबरदस्त धक्का बसला. भारताविरुद्धच्या सामन्यात शानदार खेळी करणारा ॲलेक्स हेल्सला शाहीन आफ्रिदीने बाद केले. यानंतर फिल सॉल्ट, जोस बटलरही एकामागोमाग एक बाद झाले. मात्र, अनुभवी बेन स्टोक्सने हॅरी ब्रुकसह ३९ धावांची महत्त्वाची भागीदारी केली. मोईन अलीनेही १३ चेंडूवर १९ धावांचे योगदान दिले. स्टोक्सनेच आपले अर्धशतक पूर्ण करून संघासाठी विजयी धाव काढली. अशाप्रकारे इंग्लंडने एक षटक राखून अंतिम सामन्यात विजय मिळवला.

याचदरम्यान, भारताचे माझी खेळाडू आणि फिरकीपटू निखिल चोप्रा यांनी भारतीय संघाचे कान टोचले आहेत. ते म्हणाले टी२० मधील प्रदर्शन सुधारण्यासाठी भारतीय संघाने इंग्लंडकडून प्रेरणा घ्यावी. निखिल म्हणाले की, पुढील विश्वचषकासाठी भारताने रोडमॅप तयार करणे खूप महत्त्वाचे आहे. त्यासाठी त्यांनी इंग्लंडकडून प्रेरणा घेणे गरजेचे आहे.

निखिल पुढे म्हणाले की, “२०१५ साली इंग्लंड उपांत्य फेरीत प्रवेश करू शकला नाही. मात्र यानंतर त्यांनी शानदार वापसी केली आहे. या स्पर्धेत कसे खेळायचे आहे हे त्यांनी आधीच ठरवले होते. भलेही ते जिंकले किंवा हरले, मात्र त्यांच्या फलंदाजांनी नेहमीच एक रोडमॅप सेट करण्याचा प्रयत्न केला आहे.” निखिल यांच्या या वक्त्यावरून असे लक्षात येईल की ते भारतीय संघाला फलंदाजीमध्ये अधिक लक्ष केंद्रित करण्यास सांगत आहेत. फलंदाजीच्या बाबतीत भारतीय संघाने इंग्लंडचा आदर्श ठेवावा असे त्यांना वाटते.

दरम्यान, टी२० विश्वचषकाच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात इंग्लंडने भारताचा दहा गडी राखून पराभव केल्यानंतर निखिल चोप्रा यांनी हे वक्तव्य केले. या सामन्यात भारताने निर्धारित २० षटकात सहा विकेट गमावत १६८ धावा केल्या. प्रत्युत्तरात कर्णधार जोस बटलर आणि ॲलेक्स हेल्सच्या दमदार फटकेबाजीमुळे इंग्लंडने एकही गडी न गमावता अवघ्या १६ षटकांत हे लक्ष्य गाठले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही